तरुण भारत
बुधवार, १३ एप्रिल २०२२

# दोडामार्ग महाविद्यालयातर्फे तेजस देसाई यांचा सत्कार

वार्ताहर
दोडामार्ग

दोडामार्गसारख्या दुर्गम व दुर्लक्षित असलेल्या भागातून शिक्षण घेतलेले आमच्या महाविद्यालयाचे विद्यार्थी आज अनेक क्षेत्रातून आपले नाव झळकावीत आहेत. तसेच सामाजिक कार्यातही अग्रेसर आहेत. हे आम्हा शिक्षकांना अभिमानास्पद आहे, असे गौरवोद्गार संस्थेचे कार्याध्यक्ष अभिजीत हेगशेट्ये यांनी केले.

लक्ष्मीबाई सीताराम हळबे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वार्षिक पारितोषिक वितरणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी सभापती महेश गवस, ज्येष्ठ पत्रकार जोशी, पत्रकार तेजस देसाई, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत आदी उपस्थित होते.

हेगशेट्ये पुढे म्हणाले की, याच महाविद्यालयात शिक्षण घेतलेल्या मांगेलीसारख्या




दोडामार्ग : हळबे कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वार्षिक पारितोषिक वितरणप्रसंगी पत्रकार तेजस देसाई यांच्या सत्कार करताना संस्थेचे कार्याध्यक्ष अभिजीत हेगशेट्ये. सोबत अन्य.
समीर ठाकुर

दुर्गमभागातील माजी विद्यार्थी महेश गवस यांनी राजकीय क्षेत्रात आपले नावलौकिक केले. त्यांनी काही काळ तालुक्याचे सभापती पदही भूषविले आहे. तसेच त्यांनी युवा फेस नावाचे ॲप तयार करून बाजारात आणले. ही बाब कौतुकाची आहे. त्याचप्रमाणे लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेला पत्रकार म्हणून याच महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तेजस देसाई हे समाजाच्या विविध समस्यांना वाचा फोडण्याचे काम करीत आहेत. आजवर त्यांनी आपल्या लेखणीने अनेक गरजूंना आर्थिक सहकार्याचे आवाहन समाजातील लोकांना केले आणि त्यातून अनेकांना आर्थिक सहकार्य लाभले, असे गौरोदगार काढले. या दोघाही माजी विद्यार्थ्यांचा सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत व संस्थेचे चेअरमन हेगशेट्ये यांच्या हस्ते करण्यात आला. प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांनी केले. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पी. डी. गाथाडे यांनी, पाहुण्यांचा परिचय डॉ. संजय खडपकर यांनी तर आभार प्रा. गौरेश कर्पे यांनी मानले.

### पत्रकारिता हे एक दायित्व आहे!

महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व पत्रकार तेजस देसाई यांनी विद्यार्थ्यांना प्रबोधन केले. शिक्षणाला जगण्याचे साधन न बनवता मन आणि बुद्धीच्या विकासाला ज्ञानाचे केंद्र बनवा. पत्रकारिताही नुसती बातमीदारी नव्हे सामाजिक दायित्व म्हणून आपण निभावत असल्याचे स्पष्ट केले.

## काळसेत गतिरोधकासाठी शिवसैनिकांचे साकडे

चौके : मालवण–नेरुरपार–कुडाळ या मार्गावर धामापूर ते नेरुरपार दरम्यानच्या रस्त्यावर भरधाव वाहनांमधील अपघातांची संख्या वाढल्यामुळे काळसे–धामापूरमधील ग्रामस्थांनी वाहनांच्या जीवघेण्या वेगाला आवर घालण्याची इच्छा व्यक्त केली होती. ग्रामस्थांच्या या मागणीचा पाठपुरावा म्हणून पेंडूर विभागातील शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिकांनी काळसेतील शिवाजी विद्यामंदिर आणि जि. प. प्राथमिक शाळा नं. १ येथे गतिरोधक घालण्यासाठी सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे येथील कनिष्ठ अभियंता नितीन दाणे यांना निवेदन दिले. यावेळी पेंडूर शिवसेना विभागप्रमुख अण्णा गुराम, पंचायत समिती माजी सदस्य कमलाकर गावडे, बाळ महाभोज, बाबू टेंबुलकर, विष्णू लाड आदी उपस्थित होते.